(इंग्रजी भाषेत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद.)

मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या अधिकारितेत

फौजदारी अपील अधिकारक्षेत्र

फौजदारी अपील क्र. १०७२/२०२१

चंद्रशेखर वामन पटवर्धन .. **अपीलकर्ता**

विरुद्ध

१, महाराष्ट्र राज्य

२. पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शारवा

३. माननीय जिल्हाधिकारी, मुंबई.

४. सक्षम प्राधिकरण कार्यालय

जिल्हा उपनिबंधक,

सहकारी संस्था, मुंबई - ३

५. मनोहर मारुती माजलकर .. **उत्तरवादी**

श्री. अभिजीत देसाई सह श्री. कुलदीप टी. पवार, सरिता एन. पाटील, दिग्विजय कचरे, दक्षा पुंगेरा, करण गजरा, मोहिनी रेहेपाडे, विजयसिंग अपीलकर्त्यासाठी.

श्री.भोमेश बेल्लम सह श्री.कर्मा विवान, उत्तरवादी क्रमांक १ प्रथम खबरीसाठी.

श्री.शहाजी शिंदे, 'ए' पॅनेलचे वकील सह श्री.जे.पी. याज्ञिक अतिरिक्त सरकारी वकील, राज्यासाठी.

न्यायमंच : न्या. भारती डांगरे व न्या. मंजुषा देशपांडे.

न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक : ५ सप्टेंबर २०२४.

न्यायनिर्णय अधिघोषीत केल्याचा दिनांक : २३ ऑक्टोबर, २०२४.

<u>न्यायनिर्णय: - (द्वारा भारती डांगरे,न्या.)</u>

१. चंद्रशेखर वामन पटवर्धन - या अपीलकर्त्याने एमपीआयडी केस क्र. २८/20०४ मध्ये विशेष न्यायाधीश यांनी २६/११/20२१ रोजी पारित केलेला आदेश, ज्या अंतर्गत मालमत्ता म्हणजे फ्लॅट नं. ए -४०२, सहजीवन गृहनिर्माण सरकारी संस्था, दादासाहेब पेंडसे मार्ग, गोरेगाव (पूर्व), मुंबई, जी महाराष्ट्र ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण (आर्थिक आस्थापना) अधिनियम, (थोडक्यात " एमपीआयडी अधिनियम "), कलम ४ अंतर्गत महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या आणि ८ /५/20१५ रोजी प्रकाशित झालेल्या अधिसूचनेनुसार जप्त करण्यात आली होती त्यामध्ये दावा करणाऱ्या व्यक्तीने सदर अधिनियमाच्या कलम ७ (३) अंतर्गत उपस्थित केलेला आक्षेप नाकारला गेल्यामुळे, नाराज होउन सदर अधिनियमाच्या कलम ११ अंतर्गत, प्रस्तुतचे अपील दाखल केले आहे.

२. अपीलकर्ता एका श्रीमती. मृण्मयी बर्वे हिचा जवळचा नातेवाईक असल्याचा दावा करतो. सदर फ्लॅट (सदनिका) तिच्या मालकीचा आहे आणि तो दावा करतो कि ती हयात असताना त्याच्यासोबत राहत होती आणि त्याने तिच्या दैनंदिन गरजा तसेच वैद्यकीय सेवा पुरवून तिची सेवा केली.

गोरेगाव (पूर्व), मुंबई येथे असलेली संबंधित सदनिका श्रीमती मृण्मयी बर्वे हिचे पती श्री. व्ही.जी.बर्वे यांनी १५/१/१९८४ रोजी खरेदी केली होती आणि २६/९/१९९७

रोजी सदर सदनिकेचे शेअर्स (समभाग) त्याच्या नावावर हस्तांतरित करण्यात आले होते.

श्री. व्ही.जी. बर्वे याचे ११/३/१९९८ रोजी निधन झाले आणि सदर सदनिकेतील हक्क त्याची पत्नी म्हणून श्रीमती. मृण्मयी बर्वे हिच्याकडे हस्तांतरित झाले.

११/७/१९९८ रोजी श्रीमती. मृण्मयी बर्वे हिने सदरची सदनिका ११/७/१९९८ रोजीच्या मृत्युपत्राद्वारे हस्तांतरित केली आणि १८/९/१९९८ रोजी तिने अपीलकर्त्याला त्या सदनिकेत नॉमिनी (नामनिर्देशित व्यक्ती) म्हणून नियुक्त केले.

२/१०/१९९९ रोजी श्रीमती. मृण्मयी बर्वे हिची पार्लेश्वर फायनान्स प्रा.लि.च्या संचालकपदी नियुक्ती झाली आणि ती १५/४/२००३ पर्यंत म्हणजे निवृत होईपर्यंत या पदावर कार्यरत राहिली.

३. २८/५/200४ रोजी, सी. आर. क्रमांक १९०/200४, मनोहर माजलकर यांच्या सांगण्यावरून पार्लेश्वर फायनान्स लिमिटेडच्या संचालकांविरुद्ध त्यांच्या ठेवी परत करण्यात कसूर केल्याचा आरोप ठेऊन भारतीय दंड संहितेच्या कलम ४०६ ,४२० आणि एमपीआयडी अधिनियमाच्या कलम 3 , ४ अंतर्गत नोंद करण्यात आली. ३/८/200४ रोजी श्रीमती. मृण्मयी बर्वे हिला आरोपी म्हणून हजर करण्यात आले, कारण ती १९९३ ते २००३ या कालावधीत या कंपनीची संचालिका देखील होती. १९/१२/200७ रोजी तिचे

निधन झाले आणि या घटनेच्या अनुषंगाने, ११/७/१९९८ रोजी तिने केलेल्या मृत्यूपत्राद्वारे सदनिका अपीलकर्त्याला तिचा कायदेशीर वारस म्हणून हस्तांतरित करण्यात आली.

८/५/20१५ रोजी, राज्य सरकारने आपल्या उपसचिव यांच्या मार्फत एमपीआयडी अधिनियमाच्या कलम ४ अंतर्गत अधिसूचना जारी केली आणि या अधिसूचनेमध्ये संबंधित सदनिका - ए /४०२, सहजीवन सहकारी गृहनिर्माण संस्थासह अनेक स्थावर मालमत्तेचा समावेश होता. अधिसूचनेत 'पार्लेश्वर फायनान्शियल एस्टॅब्लिशमेंट प्रा. लिमिटेड', विलेपार्ले, मुंबई, या आर्थिक आस्थापनेवर गुंतवणूकदारांकडून ठेवी स्वीकारल्याचा आरोप होता व ठेवी परत केल्या जात नसल्याच्या तक्रारी गुंतवणूकदारांकडून प्राप्त झाल्या होत्या.

वित्तीय संस्था आणि त्यांचे अध्यक्ष/संचालक ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याची शक्यता नसल्याबाबत राज्य सरकार समाधानी झाल्याने, आणि राज्य सरकार गुंतवणूकदारांच्या हिताचे रक्षण करू इच्छित असल्याने आणि अनुसूचीमध्ये समाविष्ठ केलेल्या मालमत्ता वित्तीय संस्थेने आणि तिचे अध्यक्ष/संचालक यांनी गुंतवणूकदारांनी जमा केलेल्या रकमेतून खरेदी केल्याचा निष्कर्ष काढला गेल्याबाबत राज्य सरकार समाधानी झाल्यामुळे, राज्य सरकारने एमपीआयडी अधिनियम १९९९ कलम ४ , ५ , ८ (१) आणि १२ मधील उप-कलम (१) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून

आर्थिक आस्थापना आणि तिचे अध्यक्ष/संचालक यांच्याशी संबंधित अनुसूचीमध्ये नमूद केलेली मालमत्ता जप्त केली आहे आणि त्या अनुषंगाने विशेष न्यायालयासमोर सक्षम प्राधिकरणामार्फत योग्य पावले उचलली जातील.

अनुसूचीसह असलेल्या अधिसूचनेच्या अवलोकनात पाच मालमत्ता समाविष्ट केल्या आहेत ज्यात संबंधित मालमत्तेचा समावेश आहे ज्याची किंमत रु. साठ लाख आहे.

संबंधित मालमत्तेच्या मालकाबद्दल, त्याच्या अंदाजे किंमतीसह त्याचे तपशीला शिवाय, कोणताही उल्लेख नाही.

४. अपीलकर्त्याद्वारे आणि सक्षम प्राधिकाऱ्याकडून संबंधित मालमत्ताबाबत नोटीस प्राप्त झाल्यानंतर, त्याने डिसेंबर 20१६ मध्ये एमपीआयडी प्रकरण क्रमांक २८/200४ मध्ये सक्षम न्यायालयासमोर ठळकपणे आक्षेप नमूद केला की मयत श्रीमती. मृण्मयी बर्वे ही त्याची मावशी होती आणि ती सदनिका क्रमांक ए-४०२ सहजीवन सहकारी गृहनिर्माण संस्था, गोरेगाव, मुंबई, याची मालकीण होती आणि तिने तिच्या निधनापूर्वी सदनिका त्याच्या नावे केली होता जी मार्च 200८ मध्ये त्याच्या नावावर हस्तांतरित करण्यात आली होती आणि तेव्हापासून, तो सदनिकेचा पूर्ण मालक आणि कब्जेदार होता.

५. उपस्थित केलेल्या आक्षेपात असे नमूद होते की, राज्य सरकारने प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेतील अनुक्रमांक 3 मधील मालमत्तेची जप्ती, बुद्धीचा वापर न करता वर्णन केली होती, कारण त्यात नमूद केलेल्या मालमत्तेची योग्य स्थिती तपासल्याशिवाय आक्षेपित अधिसूचना जारी करण्यात आली होती.

६. उपस्थित केलेला आक्षेप पुढीलप्रमाणे शब्दबद्ध केलेला आढळतो:-

"(सी) विधानसभेच्या हेतूकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून आक्षेपित अधिसूचना जारी केली गेली आहे. आर्थिक आस्थापनेद्वारे जमा केलेल्या ठेवींमधून संपादन केलेल्या मालमत्ता ठेवीदारांचे हित सुरक्षित ठेवण्यासाठी जप्त केल्या जाव्यात असा विधानसभेचा हेतू होता.

(डि) मी म्हणतो की, आक्षेपित अधिसूचना जारी करण्यापूर्वी सक्षम प्राधिकाऱ्याने प्रस्तावित केलेल्या मालमत्ता कशा आणि केव्हा संपादित केल्या गेल्या आणि अधिसूचना जारी केल्याच्या तारखेला त्या मालमत्तांची स्थिती काय होती याचा तपास केला पाहिजे. मी म्हणतो की अभिलेखावरून असे दिसून येते की अधिसूचना जारी करण्यापूर्वी सक्षम प्राधिकाऱ्याने अशी कोणतीही चौकशी किंवा तपस केला नाही आणि ते सक्षम प्राधिकाऱ्याने विनंती केल्याप्रमाणे परवानगी नाकारण्यासाठी स्वतःहून पुरेसे आहे.

(इ) मी म्हणतो की निशाणी १-ए मधील क्र. 3 मधील मालमत्ता, आर्थिक आस्थापनेने जमा केलेल्या ठेवींमधून संपादन केल्याचा कोणताही पुरावा नाही. याउलट, चौकशी केली असती तर, सक्षम प्राधिकाऱ्याच्या लक्षात आले असते की संबंधित सदनिका आर्थिक आस्थापनाने व्यवसाय सुरू करण्याआधीच ताब्यात घेतली होती.

(एफ) मी म्हणतो की श्रीमती. मृण्मयी बर्वे यांच्यावरील खटला संपला असल्याने आणि आर्थिक आस्थापनेच्या ठेवीदारांच्या पैशांचा संबंधीत मालमत्तेशी संबंध जोडण्यासाठी काहीही नसल्याने या विशिष्ट मालमत्तेच्या संदर्भात अधिसूचना जारी करण्याचे कोणतेही कारण नव्हते. "

७. अर्जासोबत, अपीलकर्त्याने संबंधित कागदपत्रेही न्यायालयासमोर सादर केली ज्यात दिनांक १५/१/१९८४ च्या कराराचा समावेश होता ज्या अंतर्गत श्री. विनायक बर्वे यांनी संबंधित मालमत्ता खरेदी केली होती. श्री. विनायक बर्वे याच्या नावाचे दिनांक १/५/१९८८ च्या शेअर सर्टिफिकेटची प्रत तसेच २/७/१९९८ चे देखभालखर्च देयक देखील कागदपत्रांच्या संकलनामध्ये समाविष्ट करण्यात आले होते . सहजीवन सोसायटीच्या अध्यक्षांना संबोधित केलेल्या उपविधी क्र. ३४ अन्वये नामनिर्देशन फॉर्मची प्रत, श्रीमती. मृण्मयी हिच्या मृत्युप्रमाणपत्रा सोबत जोडलेले तिचे मृत्यूपत्र, दिनांक ११/७/१९९८ द्वारे तिचा भाचा म्हणून अपीलकर्त्याची नियुक्ती करण्यात आली, यांचा

देखील कागदपत्रांच्या संकलनात समविष्ठ करण्यात आले.

८. प्रथम माहिती देणाऱ्याने अपीलकर्त्यांने घेतलेल्या आक्षेपाला देखील उत्तर दिले की, जेव्हा मालमत्ता आधीच जप्तीसाठी सुरक्षित असते तेव्हा तो मालकीचा दावा करू शकत नाही आणि गुन्ह्याच्या रकमेतून मालमत्ता खरेदी केली जात नाही हे अप्रासंगिक आहे. याशिवाय, श्रीमती मृण्मयी बर्वे हीच्या विरुद्ध कलम ३ अंतर्गत होणारी कार्यवाही रद्द करण्यात आली आहे, ही याचिका एमपीआयडी अधिनियमाच्या कलम ४ सह कलम ७ अंतर्गत सुरू केलेल्या कार्यवाहीनुसार उद्भवलेल्या तिच्या दायित्वातून मुक्त होऊ शकत नाही, असे सादर करून याचिका लढवण्यात आली. कारण कलम ४ कसुरशी संबंधित आहे, आणि फसव्या कसुरशी नाही, आणि म्हणून, दिवाणी कार्यवाही रद्द केली गेली असे म्हटले जाते जरी त्यातील गुन्हेगारी पैलू कमी होत असले तरी.

हा तो आक्षेप आहे जो एमपीआयडी अधिनियमांतर्गत नियुक्त न्यायालयाने दिनांक २६/११/20२१ च्या आदेशाद्वारे निकाली काढला आहे आणि आम्ही या आदेशातील सर्वात समर्पक निरीक्षणे पुन्हा सादर करणे आवश्यक आहे जी खालीलप्रमाणे आहेत :-

"३ अर्जदाराने आक्षेपाच्या समर्थनार्थ सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर, हे सिद्ध होते की हि सदनिका विनायक बर्वे याने १५/०१/२९८४

रोजी खरेदी केली होती. मृण्मयी बर्वे हिचे नाव विनायक ह्याचे उत्तराधिकारी म्हणून उक्त सदनिकेवर नोंद करण्यात आले होते. मृण्मयी बर्वे हिने ठेवींच्या निधीतून सदनिका विकत घेतल्याचे कोणतीही सामग्री फिर्यादी पक्षाने सादर केलेली नाही. म्हणून, एफइ ने गोळा केलेल्या ठेवींमधून सदनिका खरीदी केलेली नव्हती असा निष्कर्ष सुरक्षितपणे काढता येतो."

उपरोक्त निरिक्षण असूनही , विद्वान न्यायाधीशांनी असे मत मांडले की आरोपपत्रात, असा दावा केला आहे की एकूण गैरवापर केलेली रक्कम रु.७,५१,९७,०८४/- (रुपये सात कोटी एकावन्न लाख सत्याणव हजार आणि चौऱ्यांशी फक्त) आहे आणि तपास अधिकाऱ्याने ठेवींच्या परतफेडीसाठी त्याच्याद्वारे सुरक्षित केलेल्या मालमत्तेची यादी जोडली आहे आणि मालमत्तेचे मूल्यांकन देखील आरोपपत्राला जोडलेल्या तक्त्याच्या स्तंभ क्रमांक ४ मध्ये नमूद केले आहे ज्याचे मूल्यमापन रु. १,०८,८१,५४१/- आहे.

ही रक्कम गैरवापर केलेल्या रकमेपेक्षा कमी आहे आणि त्यात अर्जाचा विषय असलेल्या सदनिकेचा समावेश असल्याचे नोंदवून, विद्वान न्यायाधीश यांनी एमपीआयडी अधिनियमाच्या कलम ७ आणि विशेषतः मालमत्तेच्या सुटकेच्या संदर्भात तरतूद त्यास जोडली आहे.

कायद्यातील उपरोक्त तरतुदीच्या आधारे, त्यांनी अशी नोंद केली कि :-

"वरील तरतुदी लक्षात घेता, अशा आर्थिक आस्थापनाच्या ठेवीदारांना परतफेड करण्यासाठी आवश्यक असलेल्या मूल्यापेक्षा कमी मूल्याच्या नोंदची रक्कम किंवा मालमत्ता जप्तीखाली राहील, असे समाधान मिळाल्यावरच मालमत्ता जप्तीतून सोडली जाऊ शकते. संबंधित वेळी, मयत मृण्मयी बर्वे एफईची संचालिका होती. एमपीआयडी अधिनियमाच्या कलम ४ अंतर्गत मालमत्ता जप्त करण्यासाठी एफई द्वारे ठेवींची परतफेड पुरेशी आहे, जरी महाराष्ट्र सरकारकडून फसवणूक झाल्याची नोंद केली जात नसली तरी. एमपीआयडी अधिनियमाचे कलम ४, एफईच्या संचालकाचे पैसे किंवा इतर मालमत्ता जप्तीसाठी उपलब्ध नसल्यास, एफईच्या संचालकाची मालमत्ता जप्त करण्याचा अधिकार देते. म्हणून, एमपीआयडी अधिनियमाचे कलम ४ च्या तरतुदी लागू करून सदनिका जप्त करण्यात कोणतीही बेकायदेशीरता नाही. सुरक्षित मालमत्तेचे मूल्य हे गैरवापर केलेल्या रकमेपेक्षा खूपच कमी असल्याने आक्षेपाला परवानगी देता येणार नाही."

९. विद्वान न्यायाधीशांनी आणखी एक मुद्दा ज्यावर लक्ष केंद्रित केले आहे, तो म्हणजे एमपीआयडी अधिनियमाचे कलम ४ अंतर्गत अधिसूचना सदोष असल्याचा आक्षेप आहे, कारण ती गृह विभागातील सरकारच्या सचिव दर्जाच्या खाली असलेल्या अधिकाऱ्याने जारी केली आहे.

राज्यघटनेच्या अनुच्छेद १६६ (१) चा संदर्भ देऊन, आक्षेपित आदेश नोंद कि अनुच्छेद १६६ मधील कलम (2) विचारात घेते कि राज्यपालांच्या नावाने तयार केलेले व अमलात आणलेले आदेश आणि इतर विलेख, राज्यपालांद्वारे तयार करावयाच्या नियमांमध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे जसे असतील तसे प्रमाणीकृत केले जातील आणि आदेश किंवा विलेखाची वैधता इतकी अधिप्रमाणित आहे कि प्रश्नाधीन होऊ शकत नाही या कारणांवर कि हे राज्यपालांनी तयार केलेले किंवा अंमलात आणलेले आदेश किंवा विलेख नाही जरी सदर आदेशही फेटाळण्यात आला असाल तरीही.

१०. आम्ही अपीलकर्त्याचे वकील श्री. कुलदीप पवार यांच्यासह अभिजीत देसाई, उत्तरवादी क्रमांक ५, तक्रारदाराचे वकील भूमेश बेल्लम तर उत्तरवादी क्रमांक १ ते ४ यांचे प्रतिनिधित्व करणारे श्री. शहाजी शिंदे, 'अ' पॅनेलचे वकील यांच्यासह श्री.जे.पी. याज्ञिक, अतिरिक्त सरकारी वकील यांचे म्हणणे ऐकले आहे.

११. अपीलकर्त्याचे प्रतिनिधित्व करणारे श्री. देसाई यांनी यु. सुब्बद्रमा आणि इतर विरुद्ध आंध्र प्रदेश ज्याचे प्रतिनिधित्व सरकारी वकील आणि अन्य [1] द्वारे केले गेले, या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर भिस्त ठेवली. ज्याचे अनुसरण आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने गुज्जला श्रीनू आणि इतर विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य ज्याचे प्रतिनिधित्व उप. सचिव, पोलीस अधीक्षक [2] यांच्याद्वारे केले गेले, त्यामध्ये केले.

1 (२०१६) ७ एससीसी ७९७
2 २०२३ एससीसी ऑनलाइन एपी ४५७

आम्ही सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातुन निघणाऱ्या गुणोत्तराची पडताळणी केली आहे जे जप्ती कार्यवाहीशी संबंधित फौजदारी कायदा दुरुस्ती अध्यादेश, १९४४ (कलम ३, ४ आणि १३) च्या विशिष्ट संदर्भासह मयत व्यक्तीविरूद्ध फौजदारी कार्यवाही चालू ठेवण्याच्या पैलूभोवती फिरते.

सर्वोच्च न्यायालयासमोर उघड झालेल्या तथ्यांवरून असे दिसून आले आहे की अपीलकर्ता रामचंद्रय्याचे कायदेशीर प्रतिनिधी होता , ज्याच्यावर भारतीय दंड संहितेच्या कलम ४०९ आणि ४६८ सह कलम ४७१ अंतर्गत गुन्ह्यांचा आरोप होता, त्यांनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ अंतर्गत त्यांची याचिका फेटाळण्याच्या आंध्र प्रदेश, हैदराबाद उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णय आणि आदेशाविरुद्ध अपील दाखल केले होते. रामचंद्रैया, मयत, जो अपीलकर्ता क्र. १ चा पती आणि अपीलकर्ता क्र. 2 आणि 3 चे वडील होते, त्याच्या विरुद्ध ३१/७/१९८७ ते २९/६/१९८८ या कालावधीत निधीच्या गैरवापराच्या संदर्भात एका सुब्बारायुडूसह खटला चालवण्यात आला.

ऑक्टोबर १९९१ मध्ये खटल्यादरम्यान यु. रामचंद्रय्याचे निधन झाले आणि त्यानंतर, कनिष्ठ न्यायालयाने २५ /१०/१९९३ च्या न्यायनिर्णयाद्वारे इतर आरोपी सुब्बारायुडू याची निर्दोष मुक्तता केली.

कनिष्ठ न्यायालयाने तोंडी आणि कागदोपत्री पुराव्याच्या आधारे निरीक्षण केले की

रामचंद्रय्यानेच हा गुन्हा केला होता आणि हयात असलेल्या सहआरोपींनी रामचंद्रैयाला कथित गुन्हा करण्यात मदत केली होती हे दाखवण्यासाठी कोणताही पुरावा सादर केला नाही आणि त्यामुळे कनिष्ठ न्यायालयाने रामचंद्रैयाला जबाबदार धरले. तो मयत झाल्याने त्याला गुन्ह्यासाठी दोषी ठरवता आले नाही.

१२. १९९७ मध्ये, राज्याने फौजदारी कायदा अंतर्गत अपीलकर्त्याच्या मालमत्तेच्या जप्तीसाठी फौजदारी कायदा दुरुस्ती अध्यादेश, १९४४ (अध्यादेश क्र. ३८/१९४४) अंतर्गत अर्ज दाखल केला आणि जिल्हा न्यायाधीश यांनी अध्यादेशाच्या कलम ४ अंतर्गत अंतरिम जप्ती आदेश पारित केला या कारणावर कि रामचंद्रय्या याने नियोजित गुन्हा केला आणि त्याने गुन्ह्यातील उत्पन्न म्हणून मिळालेल्या पैसे यातून प्रश्नाधीन पैसे किंवा मालमत्ता संपादित केली.

जप्तीचा आदेश कायम का करण्यात येऊ नये, यासाठी जिल्हा न्यायाधीश यांनी अपीलकर्त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आणि या आदेशात जिल्हा न्यायाधीशांनी नमूद केले की अनुसूचित नमूद केलेल्या कमीत कमी 30 बाबी ह्या बेकायदेशीरपणे मिळवलेल्या रकमेमुळे रामचंद्रय्याने स्वत:च्या नावावर किंवा पत्नीच्या नावावर किंवा त्यांच्या मुलांच्या नावावर मिळविल्या होत्या.

जिल्हा न्यायाधीश यांनी नोंदवले की कनिष्ठ न्यायालयाने हा गुन्हा करण्यासाठी

रामचंद्रय्याला जबाबदार धरले आणि 1/10/2002 रोजी अंतरिम आदेश कायम केला कारण असे आढळून आले की अपीलकर्ता अनुसूचीमध्ये नमूद केलेली मालमत्ता रामचंद्रय्या याच्या स्वकष्टार्जित मालमत्ता आहेत हे सिद्ध करण्यात अपयशी ठरला .

अपीलकर्त्यांनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ अंतर्गत एका याचिकेत जिल्हा न्यायाधीशांच्या आदेशाला आव्हान दिले आणि उच्च न्यायालयाच्या विद्वान एकल न्यायाधीशांनी असे नमूद केले की एकट्या रामचंद्रय्यानेच गुन्हा केला आणि त्याने या रकमेचा गैरवापर केला असल्याने अपीलकर्त्यांना कोणतेही लाभ दिले जाऊ शकत नाही. यामुळे अपीलकर्त्यांना सर्वोच्च न्यायालयात जावे लागले.

१३. अपीलकर्त्याच्या वतीने युक्तिवाद कि फौजदारी कायदा दुरुस्ती अध्यादेश १९४४ ने जिल्हा न्यायाधीश यांना कोणत्याही मालमत्तेच्या जप्तीची पुष्टी करण्याची परवानगी दिली नाही जरी फौजदारी न्यायालयाने वैधपणे दोषी ठरवले नाही आणि आरोपी किंवा ज्या व्यक्तीची मालमत्ता शोधण्याचा प्रयत्न केला आहे त्याची दोषी म्हणून मालमत्ता जप्त करण्यात आली. या संदर्भात असा आरोप करण्यात आला की, १९९१ मध्ये खटल्यादरम्यान रामचंद्रय्या मयत झाल्याने जप्तीसाठी कोणताही अर्ज करता आला नाही आणि तो कधीही दोषी आढळला नाही. या युक्तिवादाला विरोधकांनी विरोध केला असे सादर करून की अपीलकर्त्यांना गैरमार्गाने मिळवलेली मालमत्ता ठेवण्याची परवानगी दिली जाऊ शकत नाही आणि विद्वान न्यायाधीशांनी उक्त

मालमत्तेच्या संदर्भात जप्तीचा आदेश पारित करणे कायदेशीर आहे जी आरोपपत्राचा विषय होती.

या पार्श्वभूमीवर, विचारार्थ जो प्रश्न निर्माण झाला, तो पुढील शब्दांत मांडला गेला:-

"म्हणून, केवळ गैरव्यवहाराच्या गुन्ह्याचा गुन्हा असलेल्या परंतु फौजदारी खटला प्रलंबित असताना मृत्यू झालेल्या व्यक्तीची मालमत्ता फौजदारी कायदा दुरुस्ती अध्यादेश, १९४४ च्या तरतुदींनुसार त्याच्या कायदेशीर प्रतिनिधींकडे जप्त करता येईल का, हे तपासणे आवश्यक झाले आहे. "

१४. ह्याची नोंद करताना की जप्तीसाठी अर्ज करण्याचा विचार करता, कायद्याने राज्य सरकारला असा अर्ज करण्याचा अधिकार दिला आहे, जरी त्या व्यक्तीविरुद्धची कार्यवाही केली असली तरी कारण कलम ३ ने सरकारला असा अर्ज करण्याचा अधिकार दिल आहे जर सरकारला एखाद्या व्यक्तीने कोणताही अनुसूचित गुन्हा केला आहे असे मानण्याचे कारण असेल तर, परंतु जर सदर व्यक्तीने जिल्हा न्यायाधीशांकडे अर्ज करण्याचा विचार केला असेल ज्यांच्या अधिकारक्षेत्रातील स्थानिक हद्दीत सदर व्यक्ती सामान्यतः राहते किंवा त्याचा व्यवसाय करतो तर स्पष्टपणे अशा व्यक्तीचे अस्तित्व आवश्यक आहे आणि यामुळे मयत व्यक्तीविरुद्ध कार्यवाही करण्याची

शक्यता वगळली जाते .

या कायद्याच्या अहवालातील संबंधित निरिक्षणे पुनः मांडणे आम्हाला योग्य वाटते, ज्यामध्ये स्पष्टपणे असा निष्कर्ष काढला गेला की मयत व्यक्तीविरुद्ध कोणतीही कार्यवाही चालू ठेवता आली नसती आणि त्यात असे लिहिले आहे की :-

" कलम १३ नुसार सरकारने जिल्हा न्यायाधीशांना फौजदारी कार्यवाहीच्या स्थितीबद्दल माहिती देणे आवश्यक आहे. यासाठी सरकारने जिल्हा न्यायाधीशांना कनिष्ठ न्यायालयाच्या निकालाची किंवा आदेशाची प्रत आणि अपिलीय किंवा पुनरिक्षण न्यायालयाच्या निकाल किंवा आदेशाच्या, असल्यास, प्रती देणे आवश्यक आहे. जर उपकलम 2 आदेश देतो कि जिल्हा न्यायाधीशांनी गुन्ह्याच्या संदर्भातील मालमत्ता जप्तीचे कोणतेही आदेश त्वरित मागे घ्यावेत. जर (ए) कथित अनुसूचित गुन्ह्याची दखल घेतली गेली नाही किंवा (बी) जेथे फौजदारी न्यायालयाचा अंतिम न्यायनिर्णय आणि आदेश दोषमुक्ततेचे आहेत, हे कलम स्पष्ट नमूद करते की जप्तीचे आदेश मागे घेणे आवश्यक आहे जर या गुन्ह्याची दखल घेतली गेली नसेल किंवा दोषमुक्त केले गेले असेल तर ; कलम खटला रद्द करण्याच्या बाबतीत शांत आहे. या प्रकरणात राज्य सरकारचे म्हणणे असे आहे की जप्तीचे आदेश केवळ चालूच ठेवता आले नसते तर पुष्टीही करता आले असते. युक्तिवाद स्वीकारणे आम्हाला शक्य नाही. निर्दोष सुटल्यावर जप्तीचे

आदेश मागे घ्यावेत अशी कायद्याची आवश्यकता असल्यास, ज्याची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे अशा आरोपीच्या मृत्यूमुळे खटला रद्द होतो किंवा तो दोषी ठरू शकत नाही तेव्हा असे आदेश मागे घेणे आवश्यक आहे. खटला रद्द करण्याची संकल्पना कलमामध्ये समाविष्ट केली जाऊ शकते जेथे फौजदारी न्यायालयाचा अंतिम न्यायनिर्णय आणि आदेश निर्दोष आहे. या संदर्भात, आरोपीला दोषी ठरविण्यापर्यंत ते तो निर्दोष असल्याचे गृहीतक लक्षात घेतले पाहिजे आणि आरोपीच्या मृत्यूनंतर या गृहीतकाचे रूपांतर झाले असे मानण्याचे कारण नाही. हे लक्षात घेतले जाऊ शकते की या न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवले जाईपर्यंत निर्दोष असल्याच्या गृहीतकाचा वारंवार पुनरुच्चार केला आहे."

१५. शेवटी, सर्वोच्च न्यायालयाचे माननीय न्यायाधीशांनी खालीलप्रमाणे नोंदवले आहे:-

"१२ खरेतर, आम्हाला आढळले आहे की विद्वान जिल्हा न्यायाधीश जप्तीची कार्यवाही अजिबात करू शकले नाहीत कारण राज्याने फौजदारी कायदा दुरुस्ती अध्यादेश, १९४४ च्या कलम 3 अंतर्गत रामचंद्रैया यांच्या विरोधात जप्तीची कार्यवाही सुरू केली होती, ज्याचा मृत्यू झाला होता. कलम 3 विचार करते की असा अर्ज जिल्हा न्यायाधीशांकडे ज्यांच्या अधिकारक्षेत्रातील स्थानिक हद्दीत सदर व्यक्ति सामान्यतः राहते किंवा व्यवसाय करते, करणे आवश्यक आहे ज्या

मालमत्तेबाबत राज्य सरकारला असे वाटते की सदर व्यक्तीने मालमत्ता गुन्ह्यांच्या कृतींद्वारे खरेदी केली आहे. हे अनाकलनीय आहे, त्यामुळे मयत व्यक्तीच्या विरूद्ध असा अर्ज केला जाऊ शकतो हे समजण्यासारखे नाही जो स्पष्टपणे सामान्यपणे निवासी आहे किंवा कुठेही व्यवसाय करत आहे असे म्हणता येणार नाही जे आरोपीच्या मृत्यूनंतर खटला चालू ठेवण्यास सक्षम करते, थोडक्यात कनिष्ठ न्यायालयांच्या कार्यवाही आणि निर्णय त्रासदायक आहेत. प्रथमतः, आरोपीचा मृत्यू झाला असला तरी, कनिष्ठ न्यायालयाने खटला चालवला आणि त्याच्या मृत्यूनंतर दोन वर्षांनी त्याला दोषी ठरवले. त्यानंतर, सत्र न्यायालयासमोर त्याच्या मालमत्तेची जप्ती करण्यासाठी या दोषसिद्धीचा आधार म्हणून वापर केला गेला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, सर्व अर्ज यशस्वी झाले, जप्ती कायम केली गेली आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे उच्च न्यायालयाने जप्ती कायम केली ."

१६. या निकालाचे आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने अनुसरण केले जेव्हा एसपीई आणि एसीबी प्रकरणांच्या खटल्यासाठी विशेष न्यायाधीश, कुर्नुल यांच्या आदेशाविरुद्ध अपील दाखल केले गेले, ज्यांनी फौजदारी कायदा अध्यादेश, १९९४ वर भिस्त ठेवली आणि अपीलकर्त्यांच्या नावावर असलेली मालमत्ता जप्त करण्यासाठी अपीलकर्त्यांचे प्रकरण असतानाही, त्याला आरोपी म्हणून हजर करण्यात आले असतानाही आणि

एसीबी प्रकरणांचा आरोप असलेला, तपास प्रलंबित असतानाही आणि राज्य सरकारकडून अधिकृतता मागितली असतानाही, अंतरिम आदेश मंजूर केला.

सीआयडीने अपीलकर्त्याच्या भूमिकेला विरोध केला की, अध्यादेशाने असे स्पष्ट केले आहे की तपास यंत्रणा किंवा राज्य सरकारला गुन्हेगारी कृत्यांमधून मिळालेल्या नफ्यातून मिळालेल्या सर्व मालमत्ता यांचा शोध घेण्याचा आणि जप्त करण्याचा अधिकार असेल आणि राज्य सरकारला केवळ आरोपीच्या नावावर असलेली मालमत्ताच नाही, तर इतर मालमत्ता देखील जी गुन्ह्यातील आरोपींनी मिळविली असेल ती जप्त करण्याचा अधिकार असेल ज्याचा शोध लावला जाऊ शकतो.

१७. अपीलकर्त्याने उद्धृत केलेला यु. सुब्बद्रमा प्रकरणातील निर्णय खटल्या दरम्यान आरोपी व्यक्तीचे निधन झाल्याचे सादर करून अपीलकर्त्याला वेगळे करण्याचा प्रयत्न करण्यात आला, परंतु खटला सुरूच राहिला आणि मयत व्यक्तीला दोषी ठरविले गेले.

फौजदारी कायदा अध्यादेश १९४४ च्या जुन्या विश्लेषणावर, आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाच्या विद्वान एकल न्यायाधीशांनी खालीलप्रमाणे निरीक्षण केले :-

> "१३. प्रस्तुतच्या प्रकरणात, अपीलकर्त्यांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. यापैकी तीन व्यक्तींना मुख्य प्रकरणात आरोपी ठरविण्यात आले आहे.

अपीलकर्ते ४ ते ६ हे आरोपी क्रमांक १ ते 3 चे कुटुंबीय आहेत. अपीलकर्त्यांविरुद्ध आरोप असे आहेत की, सहा व्यक्तींच्या नावावरील मालमत्ता ही एखाद्या गुन्ह्याच्या कारणास्तव संपादित केलेली मालमत्ता आहे. अश्या परिस्थितीत असे नमूद करता येणार नाही कि अपीलकर्ते ४ ते ६ यांच्या मालमत्तेची जप्ती ही योजना किंवा फौजदारी कायदा अध्यादेश, १९४४ च्या बाहेर आहे. तथापि, ही मालमत्ता अनुसूचित गुन्ह्यातून मिळविलेल्या निधीतून संपादित केली गेली आहे का हा वस्तुस्थितीचा प्रश्न आहे ज्याचे उत्तर अद्याप कनिष्ठ न्यायालयाकडून मिळालेले नाही.

१४. हे दोन्ही बाजूंनी मान्य केलेले प्रकरण आहे की ४ थ्या अपीलकर्त्याचे जप्तीसाठी अर्ज करण्यापूर्वीच निधन झाले.

१५. माननीय सर्वोच्च न्यायालयाने रवी सिन्हा आणि इतर विरुद्ध झारखंड राज्य, यु. सुब्बद्रमा आणि इतर विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य आणि अन्य ४ या प्रकरणात असे मत मांडले की फौजदारी कायदा दुरुस्ती अध्यादेशांतर्गत संस्था किंवा मयत व्यक्तीविरुद्ध कार्यवाही करण्यास परवानगी नाही आणि अशा सर्व कार्यवाही बाजूला ठेवाव्या लागतील. जरी, वस्तुस्थितीवर काही फरक असले तरी, माननीय सर्वोच्च न्यायालयाने मांडलेले तत्व , की मयत व्यक्तींविरुद्ध अशा कार्यवाहीस परवानगी नाही, हे या न्यायालयावर बंधनकारक आहे.

१६. या परिस्थितींमध्ये, चौथ्या अपीलकर्त्याच्या मालमत्तेची जप्ती अनुज्ञेय नाही आणि ४ थ्या अपीलकर्त्याच्या मर्यादेपर्यंत कनिष्ठ न्यायालयाने 0४.0८.2022 रोजी पारित केलेला अंतरिम जप्तीचा आदेश रद्द केला आहे.

१८. आयकर अधिनियम, १९६१ मधील तरतुदीशी साधर्म्य साधून श्री. देसाई यांनी शबिना अब्राहम व इतर विरुद्ध केंद्रीय उत्पादन शुल्कचे जिल्हाधिकारी व सीमाशुल्क [3] या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर भिस्त ठेवली ज्यामध्ये आयकर अधिनियम, १९२२ मध्ये तरतूद नसताना, मयत व्यक्तीच्या मालमत्तेतून कराचे मूल्यांकन आणि संकलन सुरु ठेवण्याबाबत असे नमूद केले कि मयत व्यक्तीच्या मालमत्तेतून कर वसूल करणे परवानगीयोग्य नाही. तथापि, मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार, विधानमंडळाने आयकर अधिनियम ,१९२२ मध्ये कलम २४ बी समाविष्ट करून दुरुस्ती केली आणि विशिष्ट तरतूद सादर केली कि एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास, त्याचा व्यवस्थापक, प्रशासक किंवा कायदेशीर प्रतिनिधी, मयत व्यक्तीच्या मालमत्तेतून शुल्काची पूर्तता करण्यास सक्षम असलेल्या मालमत्तेच्या मर्यादेपर्यंत शुल्क, अशा व्यक्तीद्वारे देय म्हणून आकारण्यात आलेला कर किंवा जर तो मरण पावला नसता तर अधिनियमांतर्गत त्यांच्याद्वारे देय असलेला कोणताही कर देण्यास जबाबदार असेल.

सदर निर्णयाच्या वाचनावरून,जेथे असे लक्षात येते की, जेव्हा एखाद्या मयत

3 (२०१४) १० एससीसी ७७०

व्यक्ती विरुद्ध कर आकारणी करण्याचा प्रश्न येतो तेव्हा त्याच्याविरुद्ध कार्यवाही करण्यासाठी केंद्रीय उत्पादन शुल्क आणि मीठ अधिनियमाद्वारे कोणतीही वेगळी यंत्रणा प्रदान केलेली नाही आणि त्याची तुलना, आयकर अधिनियम, १९२२ अंतर्गत स्थिती, ज्यात १९३३ च्या आयकर (दुसरी दुरुस्ती) अधिनियमद्वारे कलम २४ बी लागू होईपर्यंत स्थिती तशीच होती, त्याच्याशी केली.

१९. हे कलम लागू होण्यापूर्वी, मुंबई उच्च न्यायालयाला १९२२ च्या अधिनियमाच्या कलम 2(2) मध्ये समाविष्ट असलेल्या "करदाता" च्या व्याख्येचा सामना करण्याचा एक प्रसंग होता, ज्यामध्ये असे नमूद केले होते की ' करदाता ' म्हणजे अशी व्यक्ती ज्याद्वारे उत्पन्न मिळते. म्हणून, खंडपीठाने असे नमूद केले की "किंवा ज्याच्या मालमत्तेद्वारे" हे शब्द त्यांच्या अनुपस्थितीमुळे स्पष्ट आहेत आणि शुल्क आकारणी कलमात तरतूद नसताना असे सुचविले आहे की जेव्हा माणूस करास पात्र होतो तेव्हा तो अशा कराचे मुल्यांकन किंवा भरणा होण्यापूर्वीच मरण पावल्यास कर भरणे टाळू शकतो. मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने स्पष्टपणे असे नमूद केले कि, करास जबाबदार असलेला विषय मांडण्यासाठी कर आकारणीबाबत भाषा ताणण्यात न्यायालयाचे समर्थन नाही. या निर्णयाच्या अनुषंगाने, आयकर अधिनियम, १९२२ मध्ये कलम २४ बी समाविष्ट आले आणि त्यानंतर, मयत व्यक्तीचा कर त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या व्यवस्थापक, प्रशासक किंवा अन्य कायदेशीर प्रतिनिधीकडून शुल्काची पूर्तता

करण्यास सक्षम असलेल्या मालमतेच्या प्रमाणात वसूल केला जाऊ शकतो.

२०. या अधिघोषणेवर भिस्त ठेवून श्री. देसाई यांनी म्हणणे मांडले की, कायद्यात तरतूद नसताना, कायदेशीर प्रतिनिधी/उत्तराधिकारी यांना जबाबदार धरले जाऊ शकत नाही आणि संबंधीत सदनिका अपीलकर्त्याच्या ताब्यात होती आणि त्यानंतर टी त्याच्याच ताब्यात होती, एमपीआयडी अधिनियमाचे कलम ४ अंतर्गत राज्य सरकारने जारी केलेला जप्ती आदेश, कोणत्याही निष्कर्षाअभावी कि ती गुंतवणूकदारांकडून गोळा केलेल्या पैशातून खरेदी केली गेली आहे, जप्तीचा विषय होऊ शकत नाही.

श्री. देसाई यांचे हे विशिष्ट निवेदन आहे की, हे कायद्यातील एक सुस्थित तत्त्व आहे की, न्यायालय वैधानिक तरतुदीत काहीही वाचू शकत नाही, जे साधे आणि निःसंदिग्ध आहे कारण कायदा हा विधिमंडळाचा आदेश आहे आणि विधायी हेतूचा निर्णायक घटक आहे. या बाबतीत वैधानिक व्याख्येच्या सुयोग्य तत्त्वावर भिस्त ठेऊन कि न्यायालयांना संसदेच्या कायद्यातील शब्द वाचण्याचा अधिकार नाही . जोपर्यंत अधिनियमाच्या चारही बाजूंमध्ये त्याचे स्पष्ट कारण सापडत नाही तोपर्यंत न्यायालयांना संसदेच्या कायद्यातील शब्द वाचण्याचा अधिकार नाही आणि स्पष्ट आवश्यकतेशिवाय कायद्याने वगळलेली बाब न्यायालयाद्वारे पुरवली जाणार नाही, त्यांचे निवेदन आहे कि विशिष्ट पक्षाचे प्रकरण अनुरूप करण्यासाठी कायद्याची तरतूद

वाचून, कायद्याचे उल्लंघन केले जाऊ शकत नाही.

२१. तक्रारदाराचे प्रतिनिधित्व करणारे विद्वान वकील श्री. बेल्लम यांनी के. के. भास्करन विरुद्ध तामिळनाडू राज्य, [4] या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाकडे आमचे लक्ष वेधले आहे, ज्याने तमिळनाडू ठेवीदारांचे हित संरक्षण अधिनियमाच्या तरतुदी कायम केल्या, ज्या ठेवीदारांच्या हितसंरक्षणा संदर्भात आहेत.

उक्त निर्णयातील निरीक्षणांचा संदर्भ घेता कि तमिळनाडू आणि पाँडिचेरी राज्यात कार्यरत असलेल्या पॅरी मटेरिया (त्याच विषयावर किंवा समान प्रकरणात) कायद्यासह, आयुष्यातील कमाईची गुंतवणूक करणाऱ्या छोट्या ठेवीदारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी बेईमान व्यक्ती आणि कंपन्यांनी संघटित आणि असंघटित दोन्ही, फायद्यासाठी बचत योजना बनवल्या आहेत आणि अधिक वेळा गुंतवणूकदार त्यांच्या संपूर्ण ठेवी गमावतात. हे लक्षात ठेवायला हवे.

श्री.बेल्लम यांचे म्हणणे आहे की १९९९ चा एमपीआयडी हा फायदेशीर कायदा आहे आणि कायदा जो उद्देश साध्य करू इच्छितो तो साध्य करण्यासाठी न्यायालयाने या कायद्याचे प्रतिबंधक आणि उद्देशपूर्ण अर्थ लावणे आवश्यक आहे.

बॉम्बे आनंद भवन रेस्टॉरंट विरुद्ध कर्मचारी राज्य विमा महामंडळ [5] या प्रकरणात

4 (२०११) ३ एससीसी ७९३
5 (२००९) ९ एससीसी ६१

सर्वोच्च न्यायालयाच्या निरीक्षणाशी समानता काढताना कर्मचारी राज्य विमा अधिनियमाच्या तरतुदींचा अर्थ लावत असताना, तो एक फायदेशीर कायदा आहे आणि त्याच्या उद्दिष्टाला चालना देण्यासाठी त्याला एक उदार रचना प्राप्त झाली पाहिजे. निर्णयाच्या खालील परिच्छेदावर भिस्त ठेवण्यात आली :-

"20 कर्मचारी राज्य विमा अधिनियम हा एक फायदेशीर कायदा आहे. प्रस्तावनेत सुचविल्याप्रमाणे या कायद्याचा मुख्य उद्देश, आजारपण, प्रसूती आणि रोजगाराच्या दुखापतीच्या बाबतीत कारखान्यातील कर्मचाऱ्यांना काही फायदे प्रदान करणे आणि त्याच्याशी संबंधित इतर काही गोष्टींसाठी तरतूद करणे हा आहे. कर्मचारी राज्य विमा अधिनियम हा सामाजिक सुरक्षा कायदा आहे आणि सामाजिक कायद्याचा अर्थ लावणारी सर्वसामान्य तत्वे कर आकारणी कायद्याच्या स्पष्टीकरणाच्या वेगळी आहेत जे सामाजिक कायद्याच्या तरतुदींना पराभूत करू शकतील अशा कोणत्याही उपद्रवांना न्यायालयांनी तोंड देऊ नये आणि न्यायालयांनी देखील,कायद्याच्या पुस्तकावर हा कायदा सादर करण्याचा कायदेमंडळाचा उद्देश साध्य करण्यासाठी कायद्याची भाषा ताणली पाहिजे. अधिनियम म्हणून, त्याच्या उद्देशांना चालना देण्यासाठी उदारमतवादी रचना प्राप्त करणे आवश्यक आहे.

२२. श्री.बेल्लम यांच्या मते, एमपीआयडी अधिनियमाचे कलम 3 आर्थिक

आस्थापनाद्वारे फसव्या कसूरसाठी शिक्षा विहित करते आणि आर्थिक आस्थापनाच्या फसव्या कृत्यासाठी शिक्षेची तरतूद असल्याने, ते दंडनीय आहे. तथापि, त्यांच्या मते, कलम ४ जे कसूर ठेवी परत न केल्यास मालमत्ता जप्त करण्याची तरतूद करते ती एक दिवाणी कारवाई आहे आणि त्यामधील कारण कायदेशीर वारसांविरुद्ध टिकेल जरी त्यातील दंडात्मक पैलू संपुष्टात आले असले तरीही. श्री.बेल्लम यांचा असा युक्तिवाद आहे की जोपर्यंत गुन्हेगारी कारणाचा संबंध आहे, जर एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाला तर त्याचे कारण संपुष्टात येते परंतु कलम ४ दिवाणी कायद्याचा एक पैलू असल्याने, गुन्हा संपला तरीही, प्रक्रियेचे पालन करून अधिनियमाच्या कलम ४ ते ७ नुसार, श्रीमती मृण्मयी बर्वे हीचा मृत्यू झाला तरी कार्यवाही टिकेल आणि संचालिका म्हणून तिची मालमत्ता, जी जप्त करण्यात आली आहे, ती गुंतवणूकदारांना वितरित करण्याच्या हेतूने वापरली जाणे आवश्यक आहे आणि ही दिवाणी कारवाई आहे.

२३. श्री. बेल्लम यांनी महाराष्ट्र राज्य विरुद्ध ६३ मून टेक्नॉलॉजीज लिमिटेड, [6] या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निरीक्षणांवर भिस्त ठेवली आणि विशेषत : त्याचा परिच्छेद ८८ वर जो खालीलप्रमाणे आहे.

"८८ राज्य विधानमंडळात कायदा बनवण्याची विधायक क्षमता कमी नाही हे नमूद करण्याबरोबरच, भास्करन (उपरोल्लेखित) या प्रकरणातील न्यायनिर्णयाने

---

6 (२०२२) ९ एससीसी ४५७

असेही निष्कर्ष काढले की तामिळनाडू अधिनियम राज्यघटनेचे कलम १४ , १९(1)(जी) किंवा 21 च्या तरतुदींचे उल्लंघन करत नाही. त्या संदर्भात, तामिळनाडूमध्ये लागू केलेल्या कायद्याविरुद्धचे घटनात्मक आव्हान फेटाळून लावताना, न्यायालयाने नमूद केले की :

३१. राज्यघटनेच्या अनुच्छेद १४ , १९ (1)(जी) किंवा 21 चे उल्लंघन कसे होते हे पाहण्यात आम्ही अपयशी ठरतो. हा कायदा एका मोठ्या सामाजिक दुष्प्रवृत्तीवर उपाय म्हणून एक स्तुत्य उपाय आहे. काही फसव्या आर्थिक आस्थापनांद्वारे एक पद्धतशीर षडयंत्र रचले गेले ज्यांनी ठेवीदारांची फसवणूक केली नाही तर ठेवीदारांच्या निधीचा अपहार केला किंवा वळवला. आमचे असे मत आहे की ठेवीदारांची पिळवणूक करण्यासाठी वित्तदाताचे कृत्य म्हणजे ठेवीदारांच्या विश्वासाचा कुप्रसिद्ध गैरवापर आहे ज्यांनी त्यांचे पैसे निर्दोषपणे उच्च व्याजदरासाठी आर्थिक आस्थापनांकडे जमा केले. या ठेवीदारांना त्यांच्या ठेवीची पोचपावती म्हणून एक लहान पासबुक दिले जात असे, जे ते त्यांच्या मुलांचे उच्च शिक्षण किंवा त्यांच्या मुलींच्या लग्नासाठी किंवा बहुतेक वृद्ध ठेवीदारांच्या बाबतीत वैद्यकीय विम्याचे धोरण म्हणून मानतात. परंतु प्रत्यक्षात सर्व प्रकरणांमध्ये ते टाकाऊ कागदावर असुरक्षित वचन होते. पाल्यांनी घराबाहेर काढलेले ८० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक, ६० ते ८० वयोगटातील ज्येष्ठ नागरिक, विधवा, अपंग,

सरकारी कर्मचारी आणि पेन्शनधारक आणि दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती या ठेवीदारांचा यात मोठा समावेश आहे. आक्षेपित अधिनियमाच्या मदतीशिवाय, त्यांच्या ठेवी आणि त्यावरील व्याज वसूल करणे अशक्य होते.

३२. पारंपारिक कायदेशीर कार्यवाही ज्यामध्ये न्यायालयीन शुल्क, वकिलांची फी, याशिवाय इतर गैरसोयींचा मोठा खर्च आणि न्यायालयातील डॉकेट एक्सप्लोजन (निकाली काढावयाच्या खटल्यांपेक्षा दाखल होत असलेले खटले जास्त आहेत.) मुळे खटले निकाली काढण्यात झालेला दीर्घ विलंबामुळे ठेवीदारांना त्यांचे पैसे त्यावरील व्याज सोडा, वसूल करणे शक्य झाले नसते. त्यामुळे, आमच्या मते, या संदर्भात ठोस पावले उचलून ठेवीदारांना त्यांचे पैसे जलद गतीने परत मिळवता यावेत यासाठी आक्षेपित अधिनियम योग्यरीत्या लागू करण्यात आला आहे.

३३. राज्य हे नागरिकांच्या कल्याणाचे पालक असल्याने पॅरन्स पॅट्रीए (देशाचे जनक) या फसवणुकीवर उपाय शोधल्याशिवाय मूक प्रेक्षक म्हणून राहू शकत नाही. आर्थिक फसवणूक करणारे, जे काहीहि नाहीत परंतु फसवे आणि ढोंग करणारे आहेत आणि ज्यांची काहीही सामाजिक जबाबदारी नसून त्यांना गुंतवणुकदारांना आकर्षक परताव्याची खोटी आश्वासने देऊन केवळ सुलभ पैशाची लालसा आहे, त्यांना कठोरपणे सामोरे जावे लागले. मोठ्या संख्येने

वैयक्तिक ठेवीदारांकडून गोळा केलेल्या छोट्या रक्कमांची परिणीती मोठ्या पैश्याच्या रकमेत झाली. ही गोळा केलेली रक्कम तृतीय पक्षकारांच्या नावावर वळवली गेली आणि शेवटी एके दिवशी फसवणूक करणाऱ्यांनी त्यांची आर्थिक संस्था बंद केली आणि निष्पाप ठेवीदारांना वेठीस धरले."

श्री. बेल्लम यांचा असा युक्तिवाद आहे की, दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ३७ अन्वये मयत प्रतिवादीच्या वारसांना आणि प्रतिनिधींना दिवाणी प्रक्रियेच्या संहितेअंतर्गत कोणतेही संरक्षण नसल्यामुळे त्यांच्याविरुद्ध खटला दाखल करण्याचा अधिकार टिकून राहतो, आणि फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ५२ अंतर्गत प्रतिवादीच्या वारसांना आणि कायदेशीर प्रतिनिधींना संरक्षण हे आदेशाच्या अंमलबजावणी विरुद्ध संरक्षण आहे आणि जेथे मयत व्यक्तीचा कायदेशीर प्रतिनिधी म्हणून एखाद्या पक्षाविरुद्ध आदेश पारित केला जातो आणि तो मयत व्यक्तीच्या मालमत्तेतुन पैसे भरण्यासाठी पारित केलेला असतो तेव्हा अशा मालमत्तेची जप्ती आणि विक्री करून त्याची अंमलबजावणी केली जाऊ शकते आणि अशा मयत व्यक्तीकडे असलेल्या मालमत्तेच्या मर्यादेपर्यंत आदेश अंमलात आणला जाऊ शकतो. समन्स फॉर जजमेंट अंतर्गत बँक ऑफ इंडिया विरूद्ध इंडस्ट्रियल पॉलिमर [7] या खटल्यात मयत प्रतिवादीचे वारस आणि कायदेशीर प्रतिनिधी यांच्या विरुद्ध समरी सूट दाखल करता येईल का या बाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या निरीक्षणांवर त्यांनी भिस्त ठेवली.

7 एसजे क्रमांक ३३७/१९८९

२४. प्रति युक्तिवादाचा विचारपूर्वक विचार केल्यानंतर १९९६ च्या अधिनियम (आर्थिक आस्थापनांमधील ठेवीदारांच्या हिताचे रक्षण करणारा अधिनियम) च्या उद्देशाबाबत आमच्या मनात कोणतीही शंका नाही, हा आर्थिक आस्थापनांमधील ठेवीदारांच्या हिताचे रक्षण करणारा अधिनियम आहे आणि १९९९ चा अधिनियम लागू झाला त्या पार्श्वभूमीबद्दल आम्ही जागरूक आहोत.

२५. अधिनियमाच्या कलम 3 मध्ये, एखाद्या आर्थिक आस्थापनाद्वारे व्याज, बोनस, नफा इत्यादी कोणत्याही फायद्यांसह मुदतपूर्तीवर ठेवी परत करण्यात केल्या गेलेल्या फसव्या चुकांबद्दल किंवा वित्तीय आस्थापना फसवणूक करून ठेवींवर हमी दिल्याप्रमाणे सेवा प्रदान करण्यात अयशस्वी झाल्यास, दंडाची तरतूद आहे आणि अशा परिस्थितीत, प्रत्येक व्यक्ती प्रवर्तक, भागीदार, संचालक, व्यवस्थापक किंवा व्यवस्थापनासाठी जबाबदार असलेल्या कर्मचाऱ्यांसह किंवा आर्थिक आस्थापनेचा व्यवसाय किंवा व्यवहार चालविणारा दोषी आढळल्यास त्यामध्ये विहित मुदतीसाठी त्याला शिक्षा होईल आणि एक लाख रुपयांपर्यंतचा दंड देखील आकारला जाईल.

अधिनियमाचे कलम ४ ज्याची सुरवात एक 'अडथळा नाही' कलमाने होते ते आकस्मिकतेची तरतूद करते जेव्हा ठेवीदारांकडून तक्रार प्राप्त होते की आर्थिक आस्थापना ठेव परत करण्यात किंवा व्याज किंवा इतर खात्रीशीर लाभ किंवा वचन दिलेली सेवा प्रदान करण्यात अयशस्वी झाले आहे आणि जेव्हा सरकार त्याबाबत

समाधानी होते आणि जेव्हा त्याला आर्थिक आस्थापना मोजणीच्या पद्धतीने, ठेवींच्या व्याजासाठी हानिकारक, त्यांची फसवणूक करण्याच्या हेतूने, कार्य करत आहे यावर विश्वास ठेवण्याचे कारण असते तेव्हा ते उक्त कलमात तरतूद केल्याप्रमाणे कारवाही करू शकते.

एमपीआयडी अधिनियमाच्या कलम ४ चे पुनरुत्पादन करणे योग्य आहे :-

(४)(१) इतर कोणत्याही कायद्यात काही काळ अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही नमूद असले तरीही, -

(१) जेथे ठेवीदारांकडून किंवा अन्यथा प्राप्त झालेल्या तक्रारींवर, कोणतीही आर्थिक स्थापना अयशस्वी झाल्याबद्दल सरकार समाधानी आहे, -

(ए) मुदतपूर्तीनंतर किंवा ठेवीदाराच्या मागणीनुसार ठेव परत करणे; किंवा

(बी) व्याज किंवा इतर खात्रीशीर लाभ देणे; किंवा

(सी) अशा ठेवींवर वचन दिलेली सेवा प्रदान करणे; किंवा

(२) जेथे सरकारकडे असे मानण्याचे कारण आहे की कोणतीही आर्थिक आस्थापना ठेवीदारांच्या हितास हानी पोहोचवण्याच्या हेतूने गणना केलेल्या पद्धतीने कार्य करत आहे; आणि जर सरकार समाधानी असेल की अशा आर्थिक आस्थापना ठेवीदारांना पैसे

ठेवी किंवा व्याज किंवा इतर फायदे किंवा ज्याच्या विरूद्ध ठेव प्राप्त होते ती सेवा प्रदान करण्याची शक्यता नाही तर सरकार, ठेवीदारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी, लेखी कारणे नोंदवल्यानंतर, ते अधिकृत राजपत्रात प्रकाशित करून, अशा आर्थिक आस्थापनाने स्वतःच्या किंवा इतर कोणाच्याही नावाने पैसे किंवा इतर मालमत्ता संपादन केल्याचे मानले गेल्यास किंवा असे स्पष्ट झाल्यास कि असे पैसे किंवा इतर मालमत्ता जप्तीसाठी उपलब्ध नाही किंवा ठेवींच्या परतफेडीसाठी पुरेशी नाही तर, उक्त वित्तीय आस्थापनेची किंवा उक्त आर्थिक आस्थापनेचे प्रवर्तक, संचालक, भागीदार किंवा व्यवस्थापक किंवा उक्त सदस्य यांची इतर मालमत्ता, योग्य वाटल्यास, जप्त करण्याचे आदेश जारी करतात.

२६. वरील तरतुदीचे वाचन केल्यावर हे स्पष्ट होते की जेव्हा राज्य सरकार समाधानी होते की वित्तीय संस्था ठेवी परत करू शकत नाही किंवा गुंतवणूकदारांना /ठेवीदारांना व्याज किंवा इतर फायदे देऊ शकत नाही तेव्हा त्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी, अशा आर्थिक आस्थापनांनी जमा केलेल्या ठेवींमधून स्वतःच्या नावावर किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या नावावर संपादन केलेले पैसे किंवा इतर मालमत्ता जप्त करण्याचा लेखी आदेश जारी केला जाईल.

आक्षेपित आदेशात स्पष्टपणे नमूद आहे कि अपीलकर्त्याच्या ताब्यात असलेली सदनिका आर्थिक आस्थापनांनी गोळा केलेल्या पैशातून खरेदी केलेली नाही, ज्यावर

आता संचलिकांसह ठेवी परत न केल्याचा आरोप आहे.

अधिनियमाच्या कलम ४ अन्वये विचारात घेतलेली दुसरी आकस्मिकता म्हणजे जेव्हा राज्य सरकार पैसे किंवा इतर मालमत्ता जप्त करू शकते, जर असे स्पष्ट झाले की असे पैसे किंवा इतर मालमत्ता जप्तीसाठी उपलब्ध नाही किंवा ठेवींच्या परतफेडीसाठी ती पुरेशी नाही तर अशा आर्थिक आस्थापनेची किंवा प्रवर्तक, संचालक, भागीदार किंवा व्यवस्थापक किंवा सदस्य यांची इतर मालमत्ता, सरकारला योग्य वाटल्यास, जप्त केली जाऊ शकते.

२७. एमपीआयडी अधिनियमाच्या योजनेत कलम ४ आर्थिक आस्थापनेद्वारे संपादित केलेली रक्कम किंवा इतर मालमत्तेच्या जप्तीचा विचार करते किंवा जर असे पैसे किंवा इतर मालमत्ता जप्तीसाठी उपलब्ध नसेल किंवा ठेवींच्या परतफेडीसाठी पुरेशी नसेल तर, आर्थिक आस्थापनेची किंवा संचालकांची देखील अशी इतर मालमत्ता सरकारला योग्य वाटल्यास, जप्त केली जाईल.

उपलब्ध दुसरा पर्याय वापरण्यासाठी, जेव्हा राज्य सरकार मालमत्ता जप्त करण्याच्या या अधिकाराचा वापर करते तेव्हा ती संचालक किंवा प्रवर्तक यांची मालमत्ता असणे आवश्यक आहे.

या प्रकरणातील तथ्यांमध्ये, घटनांचा क्रम लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

अपीलकर्ता हा मृण्मयी बर्वेचा भाचा आहे जी १९९९ ते २००३ पर्यंत पार्लेश्वर फायनान्स प्रायव्हेट लिमिटेडची निवृत्त होईपर्यंत संचालिका होती. संबंधित सदनिका तिचे पती श्री. व्ही. जी. बर्वे यांनी सन १९८४ मध्ये खरेदी केली होती आणि त्याच्या निधनानंतर ही मालमत्ता श्रीमती. मृण्मयी बर्वे हिच्याकडे हस्तांतरित झाली, जिने ती अपीलकर्त्यास मृत्युपत्र, दिनांक ११/७/१९९८ द्वारे हस्तांतरित केली.

१९/१२/200७ रोजी तिच्या निधनानंतर, २५/९/200८ रोजी सदनिका अपीलकर्त्यास हस्तांतरित झाली. हे मान्य आहे की, मृत्यूपत्र/इच्छापत्र बाबत कोणत्याही व्यक्तीने प्रश्न विचारले नाही आणि मृत्यूपत्र अपीलकर्त्याच्या बाजूने अंतिम झाले.

८/५/ 2०१५ रोजी, जेव्हा राज्य सरकारने अधिसूचना जारी केली तेव्हा ती केवळ एका प्रतिपादनावर आधारित होती की उक्त अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या मालमत्ता ज्यामध्ये संबंधित मालमत्ता बाब क्रमांक ३ चा समावेश आहे त्या आर्थिक आस्थापना आणि त्याचे अध्यक्ष/संचालक यांनी ठेवीदारांकडून जमा केलेल्या पैशातून संपादन केल्या होत्या आणि अधिसूचना कोणत्याही प्रकारे सूचित करते की संबंधित मालमत्तेची जप्ती या कारणासाठी होती कि ठेवीदारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आर्थिक आस्थापनाची मालमत्ता अपुरी होती.

उचितपणे, अधिसूचनेत वर्णन केलेल्या पाचही स्थावर मालमत्तांचा समावेश

केवळ त्यांच्या जप्ती करणे आवश्यक आहे असे सांगून केले आहे कारण त्या अध्यक्ष/संचालकांच्या ताब्यात असलेल्या मालमत्ता आहेत आणि त्या ठेवीदारांच्या पैशातून विकत घेतल्या गेल्या आहेत, हे परिशिष्टात नमूद केलेल्या मालमत्ता क्रमांक क्रमांक 3 बाबत योग्य विधान नाही. गुंतवणुकदारांच्या/ठेवीदारांच्या पैशांतून मालमत्ता संपादन केलेली नाही, असे स्पष्टपणे आक्षेपित आदेशातही नोंदवले गेले आहे.

८/५/२०१५ पर्यंत, मृण्मयी बर्वेच्या नावावर मालमत्ता राहिली नाही, २९/५/२००८ रोजी, ती अपीलकर्त्यास तिचा कायदेशीर वारस म्हणून अंमलात आणलेल्या मृत्युपत्राद्वारे हस्तांतरित झाली होती.

हे मान्य करणे कठीण आहे कि सन २०१५ मध्ये, राज्य सरकार ही मालमत्ता जप्त करू शकले असते आणि अधिसूचना केवळ हे दर्शवित आहे कि मालमत्ता जप्त करण्यात आली कारण ती आर्थिक आस्थापना/संचालक/अध्यक्ष यांच्या मालकीची होती आणि गुंतवलेल्या पैशातून खरेदी करण्यात आली होती , जे अत्यंत चुकीचे विधान आहे.

२८. एम.पी.आय.डी.अधिनियमाचे कलम ३ आणि ४ मयत व्यक्तीविरुद्ध परिणामांच्या संदर्भात पूर्णपणे भिन्न असले तरी, ते एकमेकांपासून स्वतंत्रपणे वेगळ्या क्षेत्रात अंमलबजावणी करतात या श्री. बेल्लम यांच्या युक्तिवादाबद्दल आम्ही

प्रथमदर्शनी समाधानी नाही. तथापि, प्रस्तुतच्या प्रकरणात, आम्हाला समाधान वाटत आहे की, राज्य सरकारने कलम ४ अंतर्गत अधिसूचनेद्वारे संबंधित मालमत्ता जप्त करण्याचे निर्देश दिले केवळ या कारणावर कि ती गुंतवणूकदारांच्या पैशातून खरेदी केली गेली आहे, जो पूर्णपणे चुकीचा निष्कर्ष आहे, कारण अपीलकर्त्याने त्या संदर्भात एमपीआयडी न्यायालयासमोर पुरेसे पुरावे सादर केले आहेत आणि न्यायालयाने देखील विशेषत: त्या परिणामाचा निष्कर्ष काढला आहे, आम्हाला जप्ती बेकायदेशीर असल्याचे आढळले आहे.

तसेच, राज्य सरकारने अधिसूचना जारी केल्याच्या तारखेची संबंधित मालमत्ता ही श्रीमती मृण्मयी बर्वे यांची मालमत्ता नव्हती, असे आमच्या लक्षात आले असल्याने, ती जप्तीसाठी खुली नव्हती, कारण तसे करण्याची परवानगी असल्यास, खरे अनेक व्यवहार रद्दबातल ठरतील कारण प्रस्तुतच्या प्रकरणात श्रीमती. मृण्मयी बर्वेंचे उत्तरदायित्व टाळण्यासाठी मालमत्ता हस्तांतरित केली गेली असे राज्य सरकारचे म्हणणे नाही. परंतु ते एक खरे हस्तांतरण होते.

२९. यु. सुब्बद्रमा (उपरोल्लेखित) या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामध्ये अपीलकर्त्याच्या प्रकरणाचा समावेश होतो, कारण एमपीआयडी अधिनियमाच्या कलम ४ ते ७ च्या योजनेत संचालकाच्या मालमत्तेवर त्याच्या/तिच्या निधनानंतरही कारवाई सुरू ठेवण्याची तरतूद नसल्यामुळे, सन २०१५ मध्ये अधिसूचना जारी करून मालमत्ता

कशी काय जप्त केली जाऊ शकते याचे कोणतेही कारण आम्हाला दिसत नाही कारण ठेवीदारांचे हित नष्ट करण्यासाठी, ठेवीदारांकडून जमा केलेल्या पैशातून मिळविलेल्या मालमत्तेची विक्री करण्याची मागणी करण्यात आली आहे असे उत्तरवादींचे प्रकरण नाही.

प्रकरणाच्या वस्तुस्थितीत, केवळ त्यात नमूद केलेल्या मालमत्तेपुरते मर्यादित ठेवत, कलम ४(१) अंतर्गत राज्य सरकारने जारी केलेल्या अधिसूचनेच्या शब्दानुरूप, ठेवीदारांच्या पैशातून संपादन केल्याच्या आधारावर तसेच अधिसूचना जारी केल्याच्या तारखेला संबंधित मालमत्ता श्रीमती मृण्मयी बर्वे हिच्या नावावर नव्हती. परंतु ती त्याच्या बाजून मृत्युपत्राद्वारे आधीच हस्तांतरित केली गेली होती . त्यामुळे आम्ही २६/११/20२१ रोजीचा आक्षेपित आदेश रद्द करणे योग्य समजतो आणि राज्य सरकारने जारी केलेल्या ८/५/२०१५ च्या अधिसूचनेत अनुक्रमांक 3 मध्ये नमूद केलेली संबंधित मालमत्ता जप्तीपासून मुक्त करतो.

श्री. बेल्लम यांनी उपस्थित केलेला मुद्दा तथापि योग्य कार्यवाहीत विचार करण्यासाठी आम्ही खुला ठेवला आहे.

वरील अटींमध्ये अपील मंजूर केले आहे.

(मंजुषा देशपांडे, न्या.) **(भारती डांगरे,न्या.)**

-:अस्वीकरण:-

या न्यायनिर्णयाचा मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

-x-x-x-x-